**ठळक बातम्या**

- १४ खरीप पिकांसाठी किमान आधारभूत दरात वाढ करायला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीची मंजुरी

- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून जाणाऱ्या, रेल्वेच्या दोन मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांना केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता, शेतकऱ्यांकरता सुधारित व्याज अनुदान योजना चालू ठेवणार

- गुजरातमधे ८ हजार ३२६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर

- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार लहानु कोम यांचं निधन

**आणि**

- कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भासह देशात विविध ठिकाणी उद्या जोरदार पावसाची शक्यता

**<><><><><>**

सन २०२५ २०२६ च्या पणन हंगामासाठी १४ खरीप पिकांकरता किमान आधारभूत दरात वाढ करायला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीनं मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. यात सर्वाधिक निव्वळ वाढ कारळासाठी ८२० रुपये प्रतिक्विंटल, त्याखालोखाल रागीसाठी ५९६ रुपये, कापसासाठी ५८९ रुपये, तर तिळासाठी ५१९ रुपये प्रतिक्विंटल असल्याचं त्यांनी सांगितलं.

त्याशिवाय मका १७५ रुपये प्रतिक्विंटल, बाजरी १५० रुपये, ज्वारी ३२८, भात ६९, तूर ४५०, मूग ८६, तर उडदासाठी ४०० रुपये प्रतिक्विंटल वाढ केली

आहे. सूर्यफूल ४४१, तर सोयाबिनच्या किमान आधारभूत दरात ४३६ रुपये प्रतिक्विंटल वाढ केली आहे. त्यामुळे या खरेदीसाठी एकूण २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातून जाणाऱ्या भारतीय रेल्वेच्या दोन मल्टीट्रॅकिंग प्रकल्पांनाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या प्रकल्पांसाठी एकूण ३ हजार ३९९ कोटी रुपये खर्च येणार असून, २०२९-३० पर्यंत ते पूर्ण होतील.

२०२५-२६ साठी शेतकऱ्यांकरता सुधारित व्याज अनुदान योजना चालू ठेवायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><>**

गुजरात राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ८ हजार ३२६ गावांमधल्या ग्रामपंचायत निवडणुकांची घोषणा केली आहे. राज्य निवडणूक आयुक्त डॉ. एस. मुरली कृष्णा यांनी आज गांधीनगर इथं वार्ताहर  परिषदेत ही घोषणा केली. निवडणुकीची अधिसूचना येत्या २ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ९ जून असेल तर  छाननी १० जून रोजी केली जाईल. उमेदवारी अर्ज ११ जूनपर्यंत मागे घेता येऊ शकतील . तर मतदान येत्या २२ जून रोजी सकाळी ७ ते संध्याकाळी  ६ वाजेपर्यंत होईल आणि मतमोजणी २५ जून ला  होईल.

**<><><><>**

भारताची दहशतवादाविरुद्धची भूमिका स्पष्ट करून जगभरातल्या देशांचा पाठिंबा मिळवण्यासाठी एकंदर सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं सध्या विविध देशांना भेटी देत आहेत. या मोहिमेअंतर्गत, संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वातलं शिष्टमंडळ आज इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं पोहोचलं आणि तिथल्या नेत्यांची भेट घेतली. आम्हीही दहशतवादाचा निषेध करत असून, संवादातून प्रश्न सोडवण्यावर आमचा विश्वास आहे, असं तिथल्या नेत्यांनी सांगितलं.

शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वातलं शिष्टमंडळ काँगोचा दौरा आटोपून सिएरा लिओनच्या दिशेनं रवाना झालं.

भाजपा खासदार रविशंकर अय्यर यांच्या नेतृत्वातलं प्रतिनिधीमंडळ रोम इथं पोहोचलं. राजदूत वाणी राव यांनी त्यांचं स्वागत केलं.

काँग्रेस नेते शशी थरूर यांच्या नेतृत्वातल्या प्रतिनिधीमंडळानं पनामाच्या संसदेचे अध्यक्ष दाना कास्टानेडा यांच्यासोबत बैठक घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वातल्या शिष्टमंडळानं दक्षिण आफ्रिकेत भारताच्या दहशतवादाबद्दलच्या धोरणाची माहिती दिली.

**<><><><><>**

लोकसंख्या, लोकशाही आणि विविधता हे नव्या भारताचे तीन आधारस्तंभ असून, लोकसंख्येचा अभ्यास करणारे विद्यार्थी या तिन्ही स्तंभांच्या मध्यभागी राहून आकडेवारी आणि धोरणनिर्मिती यातला दुवा म्हणून महत्त्वाचं काम करतात, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. मुंबईत आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या ६५ व्या आणि ६६ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. देशाला शाश्वत विकासाच्या दिशेनं घेऊन जाण्यात लोकसंख्याशास्त्र अमूल्य योगदान देतं, यातल्या आकडेवारीच्या आधारे शाश्वत विकास, आर्थिक प्रगती, सामाजिक एकोपा, तसंच देशाच्या सुरक्षेच्या हिताची धोरणं आखता येतात, याकडे उपराष्ट्रपतींनी लक्ष वेधलं. जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश असलेल्या भारतात लोकसंख्याशास्त्रातलं संशोधन फक्त अभ्यासक्रमापुरतं मर्यादित राहता कामा नये, असं धनखड म्हणाले.

या क्षेत्रात काम करताना समाजाचं देणं फेडण्याचा प्रयत्न करा, असं आवाहन आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी विद्यार्थ्यांना केलं.

पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.

**<><><><><>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज त्यांना आदरांजली वाहिली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतलं सावरकरांचं योगदान तसंच त्यांचं अतुलनीय धैर्य आणि संघर्ष, एक कृतज्ञ राष्ट्र म्हणून आपण कधीही विसरू शकत नाही, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, पालघरचे माजी खासदार लहानु कोम यांचं आज पहाटे अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. लहानु कोम यांनी १९५९ पासून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. आदिवासी, शेतकऱ्यांचं संघटन बांधण्याचं काम त्यांनी अनेक वर्षे केलं. आदिवासी प्रगती मंडळाचं अध्यक्षपदही त्यांनी अनेक वर्षं भूषवलं. कोम यांच्या पार्थिवावर उद्या तलासरी इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं उद्या आसाम, मेघालय, कर्नाटकाचा किनारी भाग आणि दक्षिण कर्नाटक, केरळ, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथे मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.

अरुणाचल प्रदेश,ओडिशा,तेलंगणा,पश्चिम बंगाल आणि सिक्कीम इथेही उद्या जोरदार पर्जन्यवृष्टीची शक्यता आहे. उत्तराखंड,बिहार,छत्तीसगढ, आंध्र प्रदेशचा किनारी भाग,झारखंड, कोकण,गोवा,मध्य महाराष्ट्र,विदर्भ आणि पश्चिम मध्य प्रदेश इथेही जोरदार पर्जन्यमान होईल असा अंदाज आहे. ईशान्य भारतात पुढचे ७ दिवस मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडेल, वीजाही चमकतील तर

शुक्रवारपर्यंत पश्चिम राजस्थानात उष्णतेची लाट पसरेल आणि धुळीची वादळं होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सिक्कीम दौऱ्यात, प्रधानमंत्री “सिक्कीम ५०: या कार्यक्रमात सहभागी होतील. तसंच  राज्यातल्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील. त्यानंतर  पश्चिम बंगालमधल्या  अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यांमध्ये शहर गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी ते करणार आहेत.

बिहारमध्ये पाटणा विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन, करकट इथं  ४८ हजार ५२० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या आणि कानपूर नगरमध्ये सुमारे २० हजार ९०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी प्रधानमंत्री  करणार आहेत.

**<><><><>**

अर्जेंटिनामधे सुरु असलेल्या चौरंगी मालिकेत भारताच्या कनिष्ठ हॉकी महिला संघानं तिसऱ्या सामन्यात अर्जेंटिनाचा २-० असा पराभव केला. सामन्याच्या सुरुवातीला अर्जेंटिनाच्या मिलग्रोस डेल वेल्ल याने गोल करत सामन्यात आघाडी घेतली होती. मात्र, ४४ व्या मिनिटाला भारताच्या कनिकाने गोल करत सामन्यात बरोबरी साधली. सामन्याच्या निर्धारित वेळेत दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आल्यानं सामना १-१ असा बरोबरीत सुटला होता. मात्र पेनल्टी शूटऑऊटमधे कर्णधार आणि गोलरक्षक निधीने उत्कृृष्ट बचाव करत अर्जेंटिनाला गोल करण्यापासून रोखलं. तर लालरीनपुई  आणि लालतन्ततुआंगी यांनी प्रत्येकी एक गोल करत भारताला विजय मिळवून दिला.

भारताचा यानंतरचा सामना शुक्रवारी चिलीच्या संघाशी होणार आहे.

**<><><><><>**

सिंगापूर ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं ३२ व्या फेरीत मलेशियाच्या चुंग होन जियान आणि मुहम्मद हैकल यांचा २१-१६, २१-१३ असा पराभव करून विजयी पुनरागमन केलं आहे. सात्विक- चिराग जोडीचा मलेशियन जोडीवरचा हा दुसरा विजय होता.

पुरुष एकेरीमध्ये, लक्ष्य सेनला चिनी तैपेईच्या लिन चुन-यी विरुद्धच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात दुखापतीमुळे माघार घ्यावी लागली. मिश्र दुहेरीत, रोहन कपूर आणि रुत्विका शिवानी गड्डे या जोडीनं चेन झी यी आणि फ्रान्सिस्का कॉर्बेट या अमेरिकन जोडीचा २१-१६, २१-१९ असा पराभव करून उप-उपांत्य फेरीत प्रवेश केला.

**//<><><><><>//**